रेमुनं. ४३/२०१३
श्रीकांत विरुध्द चंद्रकांत

**नि. क. २७ खालील आदेश**

१ प्रतिवादी क्रमांक ३ यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ प्रमाणे कैफीयतीमध्ये दुरुस्ती करण्यासाठी दिलेला आहे. अर्जातील कथनानुसार कैफीयतीमध्ये नजरचुकीने व हस्तदोषाने मिळकतीचा नंबर व क्षेत्र चुकीचे नमूद झाले असून प्रतिवादी हे कैफीयतीमधील परिच्छेद क्रमांक २ व ३ मध्ये गट नंबर २६६/क पैकी ६—आर या ठिकाणी गट नंबर २६६/३ पैकी ५—आर असे नमूद करु इच्छित आहे. तसेच कलम २ मध्ये खरेदी केले या शब्दाऐवजी या मिळकतीचे मूळ खरेदीपत्र वादीचे कबजात भोगवटयास आहे, ते त्याने याकामी हजर करावे असा त्यास हुकूम व्हावा, त्याने ते हजर न केल्यास त्याबाबत दुय्यम पुरावा देणेस प्रतिवादीस परवानगी मिळावी असे नमूद करण्याची परवानगी मागितली आहे. अर्जातील पुढील कथनानुसार मागणी केलेल्या दुरुस्तीमुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नसून अर्ज मंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

२ वादीने नि. २९ कडे अर्जास म्हणणे देवून हरकत घेतली. वादीचे कथनानुसार प्रकरणामधील दिनांक २३/३/२०१५ रोजी मुद्दे काढलेले असल्यामुळे न्यायचौकशी सुरु झालेली आहे. प्रतिवादीने दुरुस्तीसाठी कोणतेही संयुक्तिक व कायदेशीर कारण नमूद केलेले नाही. तसेच ज्या मिळकतीबाबत प्रतिवादी दुरुस्ती करु इच्छित आहे त्याचा सात बारा उतारा हजर केलेला नाही. प्रतिवादी मागणी करत असलेली दुरुस्ती मंजूर केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

३ दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. तसेच वादीने नि. ३० कडे दिलेल्या लेखी युक्तीवादाचे अवलोकन केले. कागदपत्रांची पडताळणी केली. पुढील मुद्दे उपस्थित होत असून त्याचे निष्कर्ष कारणासहीत पुढीलप्रमाणे नोंदवत आहे.

| **अ. क.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | प्रतिवादी हा मागणीप्रमाणे दुरुस्तीसाठी पात्र आहे का ? | नकारार्थी |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## **कारणमिमांसा**

**मुद्दा क. १ व २ साठी** :—

४ प्रस्तुतचा दावा वाटपासाठी दाखल करणेत आलेला आहे. प्रतिवादी क्रमांक ३ ही वादीची बहीण आहे. प्रतिवादी क्र. ३ ने नि. १९ कडे कैफीयत देवून वादीच्या दाव्यातील कथनांचा इन्कार केलेला आहे. प्रतिवादीचे कथनानुसार गट नंबर २६६/क पैकी सहा आर क्षेत्र वादी व त्याचे वडील यांनी खरेदी केले. सदर कैफीयतीतील कथने पाहता प्रतिवादीने स्पष्टपणे गट नंबर २६६/क पैकी सहा आर क्षेत्र खरेदी केल्याचे नमूद केले आहे. परंतु आज या अर्जानुसार प्रतिवादी सदर गट नंबर हा २६६/३ क्षेत्र पाच आर असल्याचे नमूद करु इच्छित आहे. सदर दुरुस्तीसाठी प्रतिवादीने कोणताही आधार दाखल केलेला नाही. केवळ प्रतिवादीला वाटले म्हणून वाद कथनामध्ये दुरुस्ती करावी असे होत नाही. अर्जामध्ये दुरुस्ती करण्यासाठीचे कारण हे नजरचुकीने व अनावधानाने असे नमूद केले आहे. यावरुन प्रतिवादीकडे सदर कागद असल्याशिवाय त्याने दुरुस्ती मागितली नाही हे स्पष्ट होते. सदर कागदाचे अवलोकन केल्याशिवाय वाद कथनांमध्ये कोणतीही दुरुस्ती करण्यासाठी परवानगी देता येणार नाही हे उघड आहे. प्रस्तुत प्रकरणात दिनांक २३/३/२०१५ रोजी मुद्दे काढणेत आलेले आहेत. वादीने आज अखेर पुरावा दिलेला नाही. परंतु म्हणून दाव्यामध्ये न्यायचौकशी सुरु झाली नाही असे म्हणता येणार नाही.

५ दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ च्या परंतुका नुसार न्याय चौकशी सुरु होण्यापुर्वी दुरुस्ती का करण्यात आली नाही याचे समाधानकारक कारण पक्षकाराने दाखवणे आवश्यक असते. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादीने सदर परंतुका प्रमाणे या न्यायालयाचे समाधान केलेले नाही. सबब प्रतिवादी ही मागणी केलेली दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेस अपात्र असल्याच्या निष्कर्षास मी आलेलो आहे. सबब मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. २ साठी पुढील आदेश करीत आहे.

## आदेश

१ अर्ज नामंजूर करणेत आला.
२ खर्च कारणपरत्वे.

दिनांक ०६/१०/२०१५

सुमित वि. जोशी
सह दिवाणी न्यायाधीश क. स्त., दौंड
जि. पुणे